क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजना करिता निधी वितरण.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१७ /प्र.क्र.१२२ /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : ०८ जानेवरी, २०१८.

वाचा

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो २०१२/प्र.क्र.२५०/१२/क्रीयुसे-२, दि. २८ एप्रिल, २०१४
२. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१६ / प्र.क्र ८९ /अर्थसं-३,दि.२०.०४.२०१६ .
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र.शिक्रीपी/तरतुद/क्रीप्रकें/निवि/२०१७-१८ /का-१३ दि.१०.०८.२०१७.

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ यातील मुद्दा क्र. ६.५ क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याबाबत असून उपरोक्त संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर शिबीर व जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर आयोजनाच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्र.०३च्या पत्रान्वये सन २०१७-१८ या वर्षामध्ये राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर शिबीर व जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर आयोजन करण्यासाठी निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने या योजनेतंर्गत सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वर्षा मध्ये क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यारिता रु.२००.००लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी रु.१४०.०० लक्ष (रु. एक कोटी चाळीस लक्ष फक्त) इतकी रक्कम वितरित करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “मागणी क्र.ई-३,२२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ (२०) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात खेळांचे प्रचालन, (२०) (०२) क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजन करणे (२२०४ ५५५५)” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदी मधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. सदर योजनेअंतर्गत मास्टर ट्रेनर निवडीसाठी व जिल्हास्तरीय शिबिरार्थी निवडीसाठी संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयामधील मधील परिच्छेद क्र ५ व ६ मधील निकष लागू राहतील.

४. वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ व ३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत. यापूर्वी वितरीत केलेल्या अनुदानापैकी ७५% पेक्षा अधिक खर्च झाला आहे.

५. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८.०४.२०१७ व दि.३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित उपसंचालक / जिल्हा क्रीडा अधिकारी व लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा)यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०८१६२३५८३३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.01.08 16:30:03 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत).
७) सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत).
८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत)
९) वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे(क्रीडा संचालनालयामार्फत)
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
११) उप सचिव (क्रीडा)/ अवर सचिव (क्रीयुसे २ व ३) / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शा.शि.व क्री.वि., मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती, क्रीयुसे-२